IIP
International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# अलिप्तवादी चळवळीत भारताचे योगदान

**प्रा. सुरेखा रामदास लगड**
इतिहास विभाग प्रमुख
रा. ब. ना. बोरावके महाविद्यालय श्रीरामपूर.

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*अलिप्तवादी चळवळ*

**ABSTRACT**

द्वितीय महायुद्धानंतर शीतयुद्धामुळे जागतिक राजकारण हे द्विध्रुवीय झाले. या परिस्थितीत नवीन स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी आपल्या सार्वभौमत्वाचे संरक्षण करण्यासाठी अलिप्तवादी चळवळीचा मार्ग स्वीकारला. स्वतंत्र भारताने पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली अलिप्तवादी धोरण स्वीकारून कोणत्याही महासत्तेच्या गटाशी न बांधता स्वतंत्र परराष्ट्र धोरण राबवले. बांडुंग व बेलग्रेड या परिषदांमध्ये भारताने महत्त्वाची भूमिका बजावली. या संशोधनात अलिप्तवादी चळवळीची संकल्पना, भारताची भूमिका आणि तिचे समकालीन महत्त्व यांचे विश्लेषण करण्यात आले असून अलिप्तवादी मूल्ये आजही भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी उपयुक्त ठरत असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Lagad, S. R. (2026).** अलिप्तवादी चळवळीत भारताचे योगदान. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 744–747.*

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकाच्या मध्यकाळात जागतिक राजकारणात मोठे बदल घडून आले. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपातील ब्रिटन, फ्रान्स यांसारख्या वसाहतवादी सत्तांची आर्थिक व लष्करी ताकद कमी झाली. याचा परिणाम असा झाला की आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील अनेक देशांनी दीर्घकालीन गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वातंत्र्य प्राप्त केले. मात्र, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच या नवस्वतंत्र राष्ट्रांसमोर नव्या अडचणी उभ्या राहिल्या. त्या म्हणजे देशाची एकात्मता टिकवणे, आर्थिक विकास साधणे आणि सुरक्षितता अबाधित ठेवणे ही मोठी आव्हाने या देशासमोर होती. याच काळात अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या दोन महासत्तांमध्ये शीतयुद्ध सुरू झाले. या शीतयुद्धामुळे संपूर्ण जग दोन विरोधी गटांमध्ये विभागले गेले. एकीकडे अमेरिकेच्या नेतृत्वाखालील **भांडवलशाही गट** होता, तर दुसरीकडे सोव्हिएत रशियाच्या नेतृत्वाखालील **साम्यवादी गट** होता. या दोन्ही गटांमध्ये तीव्र राजकीय, वैचारिक आणि लष्करी स्पर्धा सुरू झाली होती. त्यामुळे जगातील प्रत्येक देशावर कोणत्या ना कोणत्या गटात सामील होण्याचा दबाव निर्माण झाला. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांसाठी ही परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गुंतागुंतीची होती. एखाद्या महासत्तेच्या गटात सामील झाल्यास देशाच्या स्वातंत्र्यावर वर मर्यादा येऊ शकत होत्या. परकीय राजकीय हस्तक्षेप, लष्करी आघाडीत अडकण्याचा धोका आणि अंतर्गत धोरणांवर बाह्य प्रभाव पडण्याची शक्यता होती. त्यामुळे अनेक राष्ट्रांना असे वाटू लागले की, राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही जर महासत्तांच्या प्रभावाखाली राहावे लागले, तर ते आपले खरे स्वातंत्र्य ठरणार नाही. याच पार्श्वभूमीवर अलिप्तवादी चळवळीचा (Non-Aligned Movement – NAM) उदय झाला. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या चळवळीला केवळ पाठिंबा दिला नाही, तर तिला वैचारिक अधिष्ठान, नैतिक दिशा व आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. भारताने अलिप्ततावादाचा स्वीकार करून स्वतंत्र परराष्ट्र धोरण राबविले आणि आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांसाठी मार्गदर्शक भूमिका बजावली.

अलिप्तवाद म्हणजे केवळ तटस्थता: राहणे नव्हे, तर कोणत्याही महासत्तेच्या गटात न जाता स्वतंत्र आणि स्वाभिमानी परराष्ट्र धोरण स्वीकारणे म्हणजेच अलिप्तवाद होय. अलिप्तवादी राष्ट्रे आंतरराष्ट्रीय शांततेचा पुरस्कार करतात, युद्धाला विरोध करतात आणि अन्याय व आक्रमणा विरोधात नैतिक भूमिका घेतात. त्यामुळे अलिप्तवादी चळवळ ही नवीन स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांच्या आत्मनिर्णयाच्या हक्काचे आणि सार्वभौमत्वाचे प्रतीक बनली.

भारताने स्वातंत्र्यानंतर लगेचच अलिप्तवादी धोरण स्वीकारले. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली भारताने शीतयुद्धातील गटराजकारणापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला. शांतता, सहअस्तित्व आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य ही भारताच्या परराष्ट्र धोरणाची मुख्य तत्त्वे होती. भारतासाठी अलिप्तवाद हा केवळ राजकीय धोरण नव्हता, तर स्वातंत्र्यलढ्यातून विकसित झालेल्या नैतिक मूल्यांचा विस्तार होता. वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वर्णद्वेष यांचा विरोध करणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे केंद्रबिंदू होते. अलिप्तवादी चळवळीच्या वैचारिक मांडणीत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्वीकारार्हतेत भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. भारताने या चळवळीला केवळ नवस्वतंत्र राष्ट्रांचा गट न मानता जागतिक राजकारणातील एक नैतिक शक्ती म्हणून उभे करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अलिप्तवादी चळवळीत भारताची भूमिका अभ्यासणे हे केवळ इतिहास समजून घेण्यासाठी नव्हे, तर आजच्या जागतिक राजकारणाचे स्वरूप समजून घेण्यासाठीही आवश्यक ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. अलिप्तवादी चळवळीच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करणे.
२. अलिप्तवादी धोरणाची संकल्पना व तत्त्वे समजावून घेणे.
३. अलिप्तवादी चळवळीत भारताच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.
४. पंडित जवाहरलाल नेहरू, नासेर, टिटो व सुकर्णो यांचे योगदान अभ्यासणे.
५. आंतरराष्ट्रीय राजकारणावर भारताच्या अलिप्त धोरणाचा प्रभाव तपासणे.

**संशोधनाची गृहीतके:**

१. भारताने अलिप्तवादी चळवळीत नेतृत्वात्मक भूमिका बजावली आहे.
२. भारताचे अलिप्त धोरण हे शांतता व सहअस्तित्वावर आधारित होते.
३. अलिप्तवादी चळवळीमुळे नवस्वतंत्र राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळाले.
४. शीतयुद्ध समाप्तीनंतर अलिप्तवादी चळवळीचे महत्त्व कमी झाले असले तरी ती पूर्णतःनिर्थक ठरलेली नाही.
५. अलिप्तवादाची मूलभूत तत्त्वे म्हणजे राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा सन्मान, आंतरराष्ट्रीय संघर्षांचे शांततामय निराकरण, कोणत्याही देशाच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे, समानता आणि सहअस्तित्व. ही चळवळ लष्करी आघाड्यांपासून दूर राहून नैतिक राजकारणावर आधारित होती.

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.
दुय्यम स्रोतांवर आधारित संशोधन संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख, नियतकालिके सरकारी दस्तऐवज, यांच्या सहाय्याने विषयाचे वस्तुनिष्ठ व शास्त्रीय विश्लेषण करण्यात आले आहे.

**अलिप्तवादी चळवळीची संकल्पना आणि पार्श्वभूमी:**

अलिप्तवादी चळवळीचा औपचारिक आरंभ १९६१ साली बेलग्रेड येथे झालेल्या पहिल्या परिषदेत झाला असला, तरी तिची बीजे १९५५ साली इंडोनेशियातील बांडुंग परिषदेत रोवली गेली होती. या परिषदेत आशिया व आफ्रिकेतील २९ देश सहभागी झाले होते. पंडित नेहरू, (भारत) टीटो (युगोस्लाव्हिया), नासेर (इजिप्त), सुकर्णो (इंडोनेशिया) आणि क्वामे एनक्रुमाह (घाना) हे अलिप्तवादी चळवळीचे प्रमुख नेते होते. अलिप्तवादाची मूलभूत तत्त्वे म्हणजे राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा सन्मान, आंतरराष्ट्रीय संघर्षांचे शांततामय निराकरण, कोणत्याही देशाच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे, समानता आणि सहअस्तित्व. ही चळवळ लष्करी आघाड्यांपासून दूर राहून नैतिक राजकारणावर आधारित होती.

**अलिप्तवादी चळवळीत भारताची भूमिका:**

अलिप्तवादी चळवळीच्या वैचारिक पायाभरणीत भारताची भूमिका अतिशय निर्णायक होती. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच जागतिक राजकारणाचा सखोल अभ्यास केला होता. त्यांना हे स्पष्टपणे जाणवले होते की, भारतासारख्या विविधतेने नटलेल्या आणि विकासाच्या मार्गावर असलेल्या देशासाठी कोणत्याही महासत्तेच्या गटात सामील होणे दीर्घकाळात नुकसानकारक ठरू शकते. आणि म्हणूनच स्वातंत्र्यानंतर भारताने स्वतंत्र परराष्ट्र धोरण स्वीकारले.
१९५५ साली इंडोनेशियातील बांडुंग येथे झालेली परिषद ही अलिप्तवादी चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली. या परिषदेत आशिया आणि आफ्रिकेतील नुकतीच नवीन स्वतंत्र झालेली राष्ट्रे प्रथमच एकत्र आली. वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वर्णद्वेषाविरोधात एकत्रित भूमिका मांडण्याचा हा त्याचा प्रयत्न होता. भारताने या परिषदेत शांततामय सहअस्तित्व, राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा सन्मान आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे शांततेने निराकरण करण्यावर भर दिला. या परिषदेमुळे अलिप्तवादी विचारांना स्पष्ट दिशा मिळाली.
१९६१ साली युगोस्लाव्हियातील बेलग्रेड येथे झालेल्या पहिल्या अलिप्तवादी परिषदेत भारत संस्थापक राष्ट्र म्हणून सहभागी झाला. या परिषदेमुळे अलिप्तवादी चळवळीची औपचारिक रचना अस्तित्वात आली. भारताने या चळवळीत नेतृत्वाची भूमिका स्वीकारून नुकत्याच स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांच्या समस्या जागतिक पातळीवर मांडल्या. विशेषतः आफ्रिकेतील वसाहतवादाविरुद्ध सुरू असलेल्या स्वातंत्र्य चळवळींना भारताने नैतिक आणि राजनैतिक पाठिंबा दिला. भारताच्या अलिप्तवादी धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सक्रिय अलिप्तवाद. भारत केवळ गटनिरपेक्ष राहिला नाही, तर आंतरराष्ट्रीय संकटांमध्ये शांततेसाठी पुढाकार घेतला. कोरियन युद्धाच्या वेळी भारताने मध्यस्थीची भूमिका बजावली. सुएझ कालवा संकटात भारताने ब्रिटन, फ्रान्स आणि इस्रायलच्या आक्रमणाचा निषेध केला. व्हिएतनाम युद्धाच्या संदर्भातही भारताने युद्धाऐवजी शांततेचा मार्ग स्वीकारण्याचा आग्रह धरला. संयुक्त राष्ट्रसंघामध्ये भारताने अलिप्तवादी राष्ट्रांचा प्रभावी आवाज बनण्याचा प्रयत्न केला. वसाहतवादविरोधी ठराव, वर्णद्वेषाविरोधी भूमिका आणि लहान राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचे संरक्षण या मुद्द्यांवर भारताने सातत्याने भूमिका मांडली. यामुळे भारताची ओळख आता केवळ एक प्रादेशिक शक्ती म्हणून नव्हे, तर नैतिक नेतृत्व करणारे राष्ट्र म्हणून निर्माण झाली.
भारताच्या या अलिप्तवादी धोरणावर काही वेळामोठ्या प्रमाणात टीकाही झाली. १९६२ मधील भारत-चीन युद्ध, सोव्हिएत रशियाशी वाढते संबंध आणि बदलते जागतिक समीकरण यामुळे भारताच्या अलिप्ततेवर प्रश्न उपस्थित झाले. काही अभ्यासकांनी भारताचा अलिप्तवाद आदर्शवादी असल्याचे मत मांडले, तर काहींनी तो बदलत्या जागतिक परिस्थितीत आवश्यक असल्याचे मानले. तरीसुद्धा भारताने परिस्थितीनुसार आपल्या धोरणात लवचिकता दाखवून अलिप्तवादी चळवळीत आपले महत्त्व कायम ठेवले. थोडक्यात अलिप्तवादी चळवळीत भारताची भूमिका ही विचारात्मक मार्गदर्शन, राजनैतिक नेतृत्व आणि नैतिक मूल्यांची जपणूक करणारी ठरली. भारताने या चळवळीला केवळ ऐतिहासिक महत्त्व दिले नाही, तर तिला जागतिक राजकारणातील एक प्रभावी आणि अर्थपूर्ण व्यासपीठ बनवण्याचा प्रयत्न केला.
सारांश रूपाने असे स्पष्ट दिसून येते की, अलिप्तवादी चळवळ ही केवळ शीतयुद्धकालीन राजकारणातून उदयास आलेली तात्कालिक व्यवस्था नव्हती, तर ती नविन स्वतंत्र राष्ट्रांच्या स्वातंत्र्य, सार्वभौमत्व आणि आत्मनिर्णयाच्या आकांक्षांचे प्रतीक होती. या चळवळीच्या संकल्पनात्मक जडणघडणीत आणि तिच्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या विकासात भारताने अत्यंत महत्त्वाची आणि निर्णायक भूमिका बजावलेली आहे. भारताने अलिप्तवादाचा स्वीकार करताना केवळ आपल्या राष्ट्रीय हितांचा विचार केला नाही, तर जागतिक शांतता, समता आणि सहअस्तित्व यांसारख्या व्यापक मूल्यांचा पुरस्कार केलेला दिसून येतो. भारताचे अलिप्तवादी धोरण हे नैतिक आदर्शवाद आणि व्यवहार्य राजकारण यांचा समन्वय साधणारे होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली भारताने शीतयुद्धातील महासत्तांच्या संघर्षांपासून स्वतःला दूर ठेवत आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतंत्र आवाज निर्माण केला.

अलिप्तवादी चळवळीच्या माध्यमातून भारताने आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांना एक सामूहिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात महासत्तां व्यतिरिक्त तिसऱ्या शक्तीचा उदय झाला, ज्यामध्ये भारताचे नेतृत्वात्मक स्थान अतिशय महत्त्वाचे ठरलेले आपणास दिसून येते.

संयुक्त राष्ट्रसंघात भारताने अलिप्तवादी राष्ट्रांचा प्रतिनिधी म्हणून महत्वाची भूमिका बजावली. वसाहतवादविरोधी, वर्णद्वेषविरोधी आणि शांततावादी ठरावांना भारताने दिलेले समर्थन हे त्याच्या परराष्ट्र धोरणातील सातत्य दर्शवते. भारताच्या या भूमिकेमुळे अनेक छोट्या व दुर्बल राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले प्रश्न मांडण्याचे धैर्य मिळाले. त्यामुळे अलिप्तवादी चळवळ ही केवळ राजकीय गटनिरपेक्षता न राहता एक नैतिक चळवळ म्हणून विकसित झाली. तसेच बदलत्या जागतिक परिस्थितीत अलिप्तवादी चळवळीसमोर अनेक आव्हाने उभी राहिली. १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर भारताच्या अलिप्ततेबाबत प्रश्न उपस्थित झाले. तसेच भारत-सोव्हिएत मैत्री करारामुळे काही प्रमाणात भारताचा सोवियत संघाकडे कल दिसून आला. यामुळे अलिप्तवादाच्या शुद्ध स्वरूपावर टीका झाली. असे असले तरीही भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात लवचिकता दाखवून अलिप्तवादाची मूलभूत तत्त्वे कायम ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. शीतयुद्ध समाप्तीनंतर द्विध्रुवीय जागतिक व्यवस्था संपुष्टात आली असली, तरी अलिप्तवादी चळवळीचे महत्त्व पूर्णतः संपलेले नाही, हे या अभ्यासातून आपणास अधोरेखित होते. आजच्या बहुध्रुवीय, जागतिकीकरणाने प्रभावित आणि प्रादेशिक संघर्षांनी ग्रस्त जगात स्वतंत्र धोरणात्मक भूमिका, शांततामय सहअस्तित्व आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य या अलिप्तवादी मूल्यांची उपयुक्तता अधिकच वाढलेली आपणास दिसून येते. त्यामुळे अलिप्तवादी चळवळ आणि भारताची भूमिका ही केवळ भूतकाळापुरती मर्यादित न राहता वर्तमान आणि भविष्यकालीन जागतिक राजकारण समजून घेण्यासाठीही महत्त्वाची ठरताना आपणास दिसून येते.

**शिफारशी:**

सदर अभ्यासाच्या आधारे असे सुचविता येते की, बदलत्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पार्श्वभूमीवर भारताने अलिप्तवादाच्या पारंपरिक संकल्पनेऐवजी तिचे आधुनिक व व्यवहार्य रूप स्वीकारावे. आजच्या बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेत भारताने स्वतंत्र धोरणात्मक भूमिका तत्त्वावर आधारित परराष्ट्र धोरण राबवणे आवश्यक आहे. कोणत्याही एका महासत्तेवर अवलंबून न राहता बहुपक्षीय सहकार्य, प्रादेशिक भागीदारी आणि जागतिक संस्थांमधील सक्रिय सहभाग यावर भर देणे ही काळाची गरज आहे. तसेच अलिप्तवादी चळवळीचे पुनरुज्जीवन करणे अलिप्तवादी राष्ट्रांनी आजच्या जागतिक समस्यांवर-जसे की दहशतवाद, हवामान बदल, आर्थिक असमतोल, मानवाधिकार आणि सामूहिक-विकास अशा भूमिका मांडणे आवश्यक आहे. भारताने या संदर्भात नेतृत्वाची भूमिका स्वीकारून अलिप्तवादी चळवळीला नव्या संदर्भात सुसंगत बनवावे. शैक्षणिक दृष्टिकोनातून पाहता, अलिप्तवादी चळवळ आणि भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास उच्च शिक्षणात अधिक सखोलपणे समाविष्ट करणे आवश्यक आहे. इतिहास, राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध या विषयांच्या अभ्यासक्रमात अलिप्तवादाचे सैद्धांतिक आणि व्यवहार्य पैलू संशोधनाभिमुख पद्धतीने शिकविले जावेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयी चिकित्सक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होईल.

**संदर्भ सूची :**


1. गर्गे, स. मा., समाजविज्ञान कोश, पुणे.
2. देशमुख, शंकर., ‘आंतरराष्ट्रीय राजकारण’, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
3. कदम, वि. भा., ‘आधुनिक जागतिक इतिहास’, फडके प्रकाशन, कोल्हापूर
4. कुलकर्णी, आर.म., ‘शीतयुद्ध आणि अलिप्त चळवळ’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
5. लोकराज्य मासिक, ‘अलिप्तवादी चळवळ विशेषांक’, महाराष्ट्र शासन
6. पाटील मधुकर व्ही., ‘आधुनिक जागतिक इतिहास’,अथर्व पब्लिकेशन्स् जळगाव.
7. वराडकर, र. हा. ‘आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण’. विद्या प्रकाशन, नागपूर.
8. देवळणकर, शैलेंद्र. अलिप्ततावादी चळवळ कालबाह्य झाली आहे काय? मिशन एमपीएससी प्रकाशन, पुणे.
9. Rajan, M.S. Non-Alignment and the Non-Aligned Movement in the Present World Order. Konark Publishers, 19